# शोध निबंध

## कुसुमाग्रजांची कविता–काही विचार

प्रा.डॉ. भिमराव ग. शेजुळे

(मराठी विभाग)

श्री वि.रू.महा.सवना

एक श्रेष्ठ आधुनिक मराठी कवी, नाटककार आणि कादंबरीकार विष्णू वामन शिरवाडकर यांनी कुसुमाग्रज या नांवाने लेखन कार्य केले आहे. कुसुमाग्रज हे नाटककार आणि तेजस्वी आशयाची कविता लिहिणारे मानवतावादी कवी आहेत. जीवनलहरी(1930), विशाखा(1942) समिधा(1949),किनारा(1952), मराठीमाती(1960),आणीस्वगत(1962 हे त्यांचे काव्यसंग्रह आजपावेतो प्रकाशित झाले आहे.

त्यांच्या दीर्घ आणी उत्कृष्ट वाड्‌मयीन सेवेबद्दल त्यांना 'ज्ञानपीठ ' हा सर्वोच्च पुरस्कार मिळाला आहे. तीस वर्षाहून थोडया अधिक कालावधीत आपल्या काव्य निर्मितीने आधुनिक मराठी कविच्या मोठया मानाचे स्थान प्राप्त करून घेणाऱ्या कुसुमाग्रजाच्या काव्य सृष्टीचे घेतलेले हे विहंगम–दर्शन आहे. भावनानी व्यथीत होणाऱ्या यौवन दशेपासून मनोविकासाच्या सोपान चढत–चढत प्रतिमेची प्रगल्मता गाठणाऱ्या प्रौढ दशेपर्यंत त्यांची काव्यशक्ती कोणती प्रगती करीत राहली त्याचाही येथे संक्षेपाने शोध घेतला आहे. त्यांच्या काव्य संग्रहातील 'समिधा' गद्यात आहे. या सर्वांच्या माध्यमातून त्यांच्या प्रतिमेचे काही 'विशेष'दर्शविण्याचा येथे प्रयत्न केला आहे.

1930 ते 1945 या काळात कुसुमाग्रज, बोरकर, कांत व श्रीकृष्ण पोवळे हे चार तरूण कवी मराठी साहित्याच्या क्षेत्रात चमकू लागले. त्या चौघांची जातकुळी एकच होती. ते चौघेही तरूण जणु एकाच नक्षत्र पुंजातील चमचमणाऱ्या चार तारका होत्या.यामध्ये मराठी माती मस्तकाला लावून जीवनाला सामोरे झालेले कुसुमाग्रज संघर्षवादी . शुध्द सौंदर्याची निर्हेतुक उधळपट्टी कुसुमाग्रांच्या प्रकृतीला मानवत नाही. त्यांच्या काव्य संसारात अशी गीते ओंजळभर सुध्दा सापडत नाहीत. कुसुमाग्रजांच्या काव्यशक्ती विषयी 'विशाखा' च्या प्रस्तावनेत वि.स.खांडेकर लिहितात 'कुसुमाग्रजांची प्रतिमा स्वभावतःप्रचारकी नाही.ती कल्पक आहे.निर्माणक (Creative) आहे . खरा कलावंत प्रचार करीत नाही. तो त्याच्या कलाकृतीतून आपोआप होत असतो.स्वतःच्याच देशाला उद्देशून स्वातंत्र्य आणि क्रांती या विषयावर कुसुमाग्रजांनी अनेक गीते लिहिली आहेत. आत्मसमर्पन अढळ आशा, प्रगतीची ओढ, जीवनावरील निष्ठा आणि तेजोपासना हे त्यांचे ठळक वैशिष्टे आहे. आत्मसमर्पणाची तळमळ कुसुमाग्रजांना ऐहिक अनुभवातून झाली असावी त्यानी स्वतःकरिता काहीच साधले नाही. लिनताच त्यांच्या जाणीवेत उरली आहे. किनारा मधील वैष्णव ही माझ्यामते एक भव्योदत्त कविता आहे.'स्वगत' मधील बंडखोर ही अशीच बलवान कविता आहे. जीवनाला सामोरे जाणारा हा कवी निराशेतून ही 'येतिल' कधी आशाचे कोकिळ चंडोल तरी उमलवतील जगी माझ्या

सोनेरी स्वरलहरी जीवनलहरी असा आशावाद बाळगून असतो. जीर्ण शीर्णाला अशातऱ्हेने धुतकारल्यानंतर कुसुमाग्रज नव्या जीवनाचे पवाड गातात. त्यातच त्यांना प्रगतीची ज्योत दिसते. प्रगतीचा मार्ग किंवा जीवनाचा प्रवास सुखाचा नाही. याची त्यांना जाणीव असते. श्रमसाफल्याची अनेक उर्जस्वल गीते, वर्षागमन आज सरे पण दहनसूत्र उत्तर रात्री रणभीषण सरले. विश्रांत सख्या हो. इत्यादी कवितात आपणास आढळतात. तेजस्वी उपासना हा त्यांचा कुलधर्म आहे. आपण आग्नीमय होउ(समीधा) वरदान, इंद्र आणि शैवांची प्रार्थना अशा अनेक कवितामधून ते अग्नीप्रज्वलीत करतात. ककुसुमाग्रजांनी आपल्या निष्ठा प्रत्येक संग्रहात निर्धाराने निश्चित केले आहेत. उषा स्वप्न, अबोध (किनारा) परंतू भिती आहे, ती व्यथेची, मस्तानी, अशब्द, मिलन, स्मरण– ही 'मराठीमाती 'या संग्रहातील गीते जितकी भावना संकुल करते तितकीच उर्मिल (Lyrical) पण आहेत. याशिवाय त्यांनी खुलदाबाद, आगऱ्यांच्या किल्हयात , औरंगाबाद , साची अशा काही स्थानपरत्वे कविता लिहिल्या आहेत. काव्यातील नाटय हे कुसुमाग्रजांना सहजगत्या साधते. चितंन पर कविता त्यांच्या सर्व संग्रहात विपूल आहेत. तथापि तत्वान्वेषणाच्या उच्चपायरीला त्या पोहचत नाहीत. कदाचित तो त्यांच्या सर्व संग्रहात विपुल आहेत. तथापि तत्वान्वेषणाच्या उच्चपायरीला त्या पोहचत नाहीत. कदाचित तो त्यांचा पिंडच नसावा. नव्हते माहित़(किनारा) या सूचकतेने सुंदर झालेल्या कवितेत अशरीणी प्रीती हे मानवी मनाने निर्मिलेले मृगजळ आहे हे कविने मोठया कुशलतेने दर्शविले आहे. त्यांचे काव्य मानवी भावनांच्या कोषातून उमलेली आणि जीवनाच्या रसाने रसरसलेली फळे आहेत. मेंदूच्या माळापेक्षा काजळाचा कोपरा त्यांना अधिक जवळचा वाटतो हे काळीज संग्रामशील व धीराचे आहे ते कायर नाही. त्यांनी परंपरेचा वारसा घेवून काव्यप्रांतात आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले त्यांची कविता मराठी कवितेच्या अनेकधारी प्रवाहातून निर्माण झालेली एक वैशिष्टपूर्ण धारा आहे. कुसुमाग्रज व केशवसुत आधुनिक काव्याचे जनक. केशवसुत व कुसूमाग्रज यांच्यामधील सामाजिक कवितेचे नाते परस्पराशी जुळणारे आहे. दोघांच्या सामाजिक कविता जर तौलनिक रीतीने बघितल्या तर त्यांच्यामध्ये एक अतुटनाते असलेले दिसते. केशवसुताची नाते असताना सुध्दा कुसुमाग्रजांची कविता काळानुसार आशयदृष्टया वेगळी झाली. स्वतःच्या राष्ट्रांच्या सीमा ओलांडून तिने सगळया मानव जातीच्या सुख दुःखाशी आपले नाते जोडले.

**कुसुमाग्रज व सावरकर**

कुसुमाग्रजांच्या कवितावर सावरकरांच्या कवितांचा देखील ठसा उपटलेला दिसतो. सावरकरांच्या कवितेतील यज्ञकल्पनाही कुसुमाग्रजांच्या मनावर खोलवर संस्कार करून गेलेली दिसते. सावरकरांच्या कवितापेक्षा कुसुमाग्रजांच्या कवितांचा घाट जरी स्वतंत्र असला तरी सावरकरांच्या व कुसुमाग्रजांच्या कल्पनाविलासाची जातकुळी एकच आहे. लौकिक व अलौकिक असे दोन्ही अर्थाचे धागे सावरकरांच्या

कवितेत गुंफलेले दिसतात. कुसुमाग्रजांचे कविता विश्व असे एका केंद्राशी निगडीत नाही. त्यांच्या कवितामध्ये आशय दृष्टया पूर्वीने प्रकटलेला एक खास विशेष दिसतो.

**कुसुमाग्रज व रविकिरण मंडळः**

कुसुमाग्रज व रविकिरण मंडळ यांच्या कवितेमधील नाते कुठे कुठे जुळतांना दिसते. कुसुमाग्रजांच्या कवितेवर माधव ज्युलीयनच्या कवितेचे संस्कार झाले दिसतात. असे असले तरी त्यांची कविता यांतून बाहेर पडली. कल्पना विकासाच्या आहारी ते कधीच जात नसुन थोडयाच शब्दांत बरेच काही व्यक्त करण्याचे त्यांचे कसब वाखाणण्यासारखे अस्मितेच्या गौरवनाथा गायिल्या त्यांची मुल्य सर्वमान्य लोकप्रिय व ध्याटणीची, सौंदर्यदृष्टी, औचित्यतत्वे सांभाळणारी होती. त्यांना मानवी सामर्थ्यावर अतूट विश्वास आहे. त्यांची प्रमिा सामाजिक व राष्ट्रीय प्रवृत्ती बरोबर वाटचाल करताना दिसते. लौकिक विषयावर काव्य लिहिणारे त्यांचे व्यक्तिमत्व अलौकिक आहे. कुसुमाग्रज हे सत्य, शिव, सौंदर्य यांचे अधिष्ठान असलेल्या नंदनवनाची उपासना करणाऱ्या मराठी रोमॅटिंक सप्रदायाचे ते आजचे सर्वश्रेष्ठ प्रतिनिधीशी आहेत. आत्मकेंद्री वर्तुळाबाहेर जावुन एक वस्तुनिष्ठ काव्य निर्माण करीत असतांनाच रोमॅटिक सौंदर्यालाही एक वेगळे परिणाम त्यांनी प्राप्त कन दिले. रा.श.वाळींबे म्हणतात,''महाराष्ट्रातील रोमॅटिकसिझमुळे कुसुमाग्रजांच्या वैफल्याच्या आकंदनाला व नादमधुर लयबध्द रचना सौंदर्याला अधोरेखित करीत निश्चय पुर्वक सांगतात की, त्यांचा पिंड भावोत्क रोमॅटिक कविताच आहे''[2]

**कवितांचे वर्गीकरणः**

**1) प्रेम कविताः—**

कुसुमाग्रजांची प्रेम कविता ही ह्रदयाला स्पर्शुन जाणारी आहे. त्यांची प्रेम कविता अनेक वळने घेत असल्यामुळे ति नव्या अपूर्वाईची वाटते.पण ही वाचतांना खऱ्या प्रेमानुभवाची व कविची चुकामुकच झाल्याचा अनुभव येतो. ह्या वि.स.खांडेकर म्हणतात,''कुसुमाग्रजासारखा श्रीमंतप्रतिभेच्या कविच्या लेखनात कोणताही विषय येवो, तो विचाराच्या दृष्टिने चमकदार कण्वक व अनुभवाच्या दृष्टिने समृध्द व नवीन असायचाच.''[3]

अभिजात व अष्टपैलू कल्पकतेमुळे कुसुमाग्रज सरस गीते लिहु शकले. त्यांची प्रेम कविता वाचताना एक जाणिव सतत मनाला सोबत करते ती हा की, या काव्यातून प्रकट होणारे कवीचे व्यक्तित्व प्रामाणिक व संपन्न तितकेच अभिजात व संयमी आहे. त्यांची कविता कल्पतेमुळे नेत्र दीपक व वैचित्र्यपूर्ण ठरली तरी तिच्या गाभ्याचा शोध मात्र कविच्या कल्पना शक्तीमध्ये घेता येत नाही.

**प्रीती विषयी अबोल असलेले कुसुमाग्रजः**

''कुसुमाग्रजाची''प्रतिभाप्रेमाच्या विषयात मात्र अबोल राहते. प्रेमाच्या उदात्ततेसाठी जे खरे समर्पण असते ते कुसुमाग्रजाच्या निदान प्रेम विषयक प्रेम गीतात तरी दिसत नाही. प्रेमाची समर्पणाची ही असीम

धुंदी त्यांच्या कवितेत मात्र दिसत नाही. त्यांच्या अनेक प्रेम कवितामध्ये प्रीतीचे संपूर्ण मिळावे की त्या प्रेमाची अपेक्षा नसते. तर त्या प्रेमासाठी स्वतःच्या जीवाची आहुती द्यायला सोसायला ती तयार असते.

**सामाजिक कविताः**

कुसुमाग्रजाच्या सामाजिक कविता ह्या वाचकांच्या मनात उलथा पालथ निर्माण करतात. वाचकाच्या मनाला पीळ पाडतात. त्यांनी आपल्या कवितामध्ये रूढी ग्रस्त व प्रवाह पतीत समाजरचनेतिल दोषांवर नेमके बोट ठेवले. सामाजिक दृष्टयाही लोकमानस व त्यांची कवितांची एकतानता जुळून आली. त्यांच्या कवितेने मानवी समानतेचा विचार मनात बाळगला. मनुष्यावर लादल्या जाणाऱ्या पारतंत्र्याविषयी आणि दारिद्रयाविषयीची चिड तीव्रपणे व्यक्त केली. यासाठी दुसऱ्यांना नाडणाऱ्या समुहांचा व विचारसरणीचा उपहास केला. मानव प्रेमापोटीच समाजोन्नतीसाठी झगडणाऱ्या व्यक्तीची गौरव गाथा त्यांनी गायीली. सामाजिक जीवनातल्या सुख दुःखाचा विचार त्यांच्या कवितेत सतत येत राहिला. त्यांनी सामाजिक विषमतेचे भेदक चित्रण आपल्या कवितामध्ये केलेले दिसते. समाजातील दुःखाची गरीबांना छळणारी विविध रूपे पाहुन कुसुमाग्रजांचे मन दुःखीत होत होते. तेच दुःख कवितेचे रूप घेवून आपल्यासमोर अवतरते. समाजातील प्रतिष्ठित व वरचढ लोक गरीबाावर अन्याय करतात. व स्वतःच्या पायाखाली त्यांना चिरडण्याचा प्रयत्न करतात. परंतु या संघर्षात विजय मात्र कुसुमाग्रजानी गरीबांचाच दाखविला आहे. त्यांच्या कवितेत सामाजिक विषमतेचे विषण्ण असे चित्र आहे. परंतू हे एक आनंदी आशावाद त्यामध्ये प्रतिबिंबीत आहे.

**निसर्ग कविताः**

निसर्ग सौंदर्याविषयी त्यांच्या मनाला असलेले आकर्षण त्यांच्या कवितेच्या अगदी आरंभापासून दिसून येतो. कुसुमाग्रज पार्श्वभूमी म्हणून अनेक ठिकाणी निसर्गाचा आधार घेवून आपल्या कवितेतील मुळभावना हया अधिक संपन्न समृध्द करतात. त्यांच्या कविता हया निसर्ग सौंदर्याने उत्फुल्ल झालेल्या आहेत. त्यांच्या कवितामधुन विविध रंगी, विविध विलासी, निसर्ग साग्रसंगीत स्वरूपात प्रकट होत असल्यामुळे ती चित्रासारखी डोळयांना दिसते. त्यांनी अनेक ठिकाणी प्रतिक म्हणुन निसर्गाचा उपयोग केला आहे. असल्यामुळे ती चित्रासारखी डोळयांना दिसते. त्यांनी अनेक ठिकाणी प्रतिक म्हणुन निसर्गाचा उपयोग केला आहे. निसर्गाच्या आधारे त्यांच्या अनेक उत्कृष्ठ कविता साकार झालेल्या आहेत. त्यामुळे त्यांचे हे वैशिष्टे बालकविशी जुळणारे आहेत. ते निसर्गाशी भावसंवाद साधताना दिसतात. निसर्गातील अनेक दृश्यांशी ते एकरूप होतात. त्यांच्या अनेक प्रेम कविता ह्या निसर्गातून साकारलेल्या दिसतात. त्यांच्या कवितेत 'नदी ' अनेक रूपे घेवून साकार होतांना दिसते. 'पक्षी ' सुध्दा त्यांची लाडकी कल्पना आहे.

**तत्वप्रधान (तात्विक) कविताः**

कुसुमाग्रजाच्या तात्विक कवितामधुन त्यांच्या ईश्वर विषयक विशिष्ट दृष्टिकोन प्रतीत होतो. ईश्वर विषयी विचार करू लागली. तेव्हा विशिष्ट एकच एक अवस्था दाखवित नाही. ईश्वर विषयक चिंतनाचे विविध भावात्मक सुर त्यांच्या कवितात दिसतात. त्यांचे मन मुर्तिपूजा मानायला तयार नाही. धर्माच्या नावाखाली माजलेली दांभिकता त्यांना नको आहे. ईश्वराविषयी त्यांचे मन नेहमीच सांशक आहे. त्यांचे एकमन ईश्वरांचे अस्तित्व नाकारते तर दुसरे ईश्वरावर श्रध्दा ठेवते. परमेश्वरांचे खरे दर्शन त्यांना निसर्गात होते.

**जिवाशीवाचे सुंदर मिलनः—**

माणुस म्हणजे जिवाशिवाची जोडी जीव लौकिकाला चटावलेला तर शिव अलौकिकाला निमग्न असलेला. एक भोगी दुःखी कष्टीतर, दुसरा त्यागी आणी सदा सुखी जिवाशीवाचे प्रेम चितारणाऱ्यास कवितांनी मराठी वाचकांच्या मनावर जे संस्कार करून ठेवले आहेत. त्यामुळे त्या कविता वाचताना मन अध्यात्मिक वळणाने वाटचाल करून येते. यात शंका नाही.

**राजकीय व राष्ट्रीय कविताः**

मराठी कवितेत आशयदृष्टयापूर्वी न प्रकटलेला एक विशेष कुसुमाग्रजांच्या राष्ट्रीय कवितेत आहे. क्रांतीला अद्युक झालेला समुह संगीन सज्ज ब्रिटीश राजसत्तेला 'गर्जा जयजय कार' क्रांतीचा गर्जा जयजयकार अपुर्व असे आहे. त्यांच्या 'विशाखा' या संग्रहातील अनेक कवितामध्ये राष्ट्रबद्दलची भावना तीव्रपणे उफाळून लावलेली दिसते. भारतीय साहित्यात नव्हे तर जागतिक साहित्यात देखील एवढया तोळामोळाचे क्रांतीयुक्त क्वचित आढळते. त्यांची सहानुभूती ही फक्त स्वदेश आणि स्वकीय त्यांच्या पुरतीत मर्यादित नाही. त्यांच्य राजकीय व राष्ट्रीय स्वरूपाची कविता ही मनात ओजोगुण निर्माण करते. एखाद्या प्रसंगाचे वर्णन करताना तो प्रसंग जसाच्या तसा उभे करण्याचे सामर्थ्य त्यांच्या कवितेत आहे. त्यांना युध्दाची भयंकर चिड आहे.(त्यांनी ''सैनिक''आणि 'खादी' या दोन्ही कवितामधून सामान्य सैनिकांचे निरपेक्ष ध्यैयवेड रंगविले आहे.  हा या कवितांचा लक्षणीयआणी अभिनंदनीय असा विशेष आहे. त्यांच्या राष्ट्रिय व राजकीय स्वरूपाच्या कविता हया अशाप्रकारे रसिक मनात ओजस्विबरोबरच कृतज्ञतेची भावना ही तेवढयात उत्कंठपणे निर्माण करतात.)

एकूणच आपल्या प्रतिभाबळाने कवितेला एक तेजस्वीपणा बहाल करणारा आत्मकेंद्री वर्तुळाबाहेर जाऊन वस्तुनिष्ठेवर आपल्या काव्यात भर देणारा, चितंनशील कवी म्हणून कुसुमाग्रज परिचीत आहेत. रोमॅंटिक सौंदर्याला एक वेगळे परिणाम कुसुमाग्रंजानी आपल्या कवितेतुन प्राप्त करून दिले. कुसुमाग्रजांची कविता अभिजातवादी, स्वच्छंदवादी आणि वास्तववादी ही आहे. त्यामुळे त्यांची कविता पृथगात्म बनताना दिसते. उतुंग कल्पनाशक्ती आणि संयमशीलता ही त्यांच्या एकुणच कवितेची महत्वाची  वैशिष्टये. समाजवादी क्रांतीची, सामाजिक, आर्थिक, विषमतेची तीव्र जाणीव कुसुमाग्रजात असल्याने त्यांच्या कवितेतुनही ही

जाणीव प्रकटणे स्वाभाविकच ठरते.'अहिनलकुल','पृथ्वीचे प्रेमगीत' मातीचीदर्पोक्ती' 'ताजमहल 'यासारख्या त्यांच्या लोकप्रिय कविता प्रत्ययकारी आहेत. कुसुमाग्रंजाची कविता आपल्या पुर्वीचे संस्कार पचवुन पण वेगळाच ध्यास घेवून पुढे निघाली आहे. त्यांच्या कवितेतुन उमटलेला क्रांतीचा हुंकार हा समाजमनाला आपला वाटतो. त्यांची राष्ट्रीय कविताही राष्ट्रभाषा ओजस्वीपणे व्यक्त करणारी आहे. कुसुमाग्रजांच्या कवितेची शब्दकळा तेजोगर्भ तेजगर्भ असल्याने एक प्रकार ओजस्वीपणा, ताजेपणा त्यांच्या कवितेला आलेला आहे. त्यांची संवेदना मध्यमवर्गीय असली तरी एक प्रकारचा बहिर्मुखपणा तिच्यात आहे. त्यामुळे ती भव्योत्कटतेच 'उदाततेचे आवाहन' करून शकते.त्यांची कविता श्रेष्ठ मूल्यांना जवळ करणारी आहे. ती स्वार्थी नाही. समाजोन्मुख आणि परार्थी आहे. समाजवादीक्रांतीची, सामाजिक, आर्थिक विषमतेची तिव्र जाणीव म्हणून त्यांच्या कवितेतुन प्रत्ययास येते. त्याची अहिनककुल म्हणजे एक जिवंत दृष्य साकार करणारी कविता आहे. ती तेजाचा ध्यास घेणारी आहे.

पृथ्वीचे प्रेमगीत ही कुसूमाग्रजाची कविता भव्यरूपकातून प्रेमभावना व्यक्त करणारी आहे. त्यांच्या कवितेतील स्वप्न रंजनात गुरफटणारी नाही. त्याच्या कवितेतील निसर्ग ही भव्यतेचे दर्शन घडविणारे आहे. अंधारापेक्षा तेजाचे दर्शन घडविणारा आहे. उत्तुंग कल्पनाविलास, प्रतिकात्मकता, संघर्षनाटय , रचनासौष्टव, कल्पनाविलास, प्रतिकात्मकता , संघर्षनाटय, रचनासौष्टव, लयबध्द छंद रचना असे काही विशेष त्यांच्या कवितेची सांगता येतील. नव कवितेच्या उषाःकाल इत्यादी वैशिष्टयपूर्ण कविता या संग्रहात आहे. समकालीन विस्फोटक राष्ट्रीय वातावरणाचे प्रत्यकारी चित्रण या कवितेत आहे.

कुसुमाग्रजानी मराठी काव्यच्या प्रांतात स्वतःच्या काव्यकर्तृत्वाने आपले विशेष व अजोड असे स्थान निर्माण केले. कविवर्य कुसुमाग्रज हे केशवसुत यांच्या परंपरेचा वारसा जगविणारे एक श्रेष्ठ कवी मानले जातात. त्यांनी कवी, नाटककार, ललित निबंधकार या नात्याने विपुल लेखन केले आहे.

त्यांनी मराठी साहित्यात विविध प्रकारचे साहित्य लिहिले असले तरी त्यांच्या कवितेचा ठसा मराठी मनावर फारच उमटलेला दिसतो.

**संदर्भग्रंथः—**


1) साहित्य विमर्शःडॉ. विद्या व्यवहारे — ( चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद)

2) शेष समीक्षा — ( अभिनव प्रकाशन, मुंबई)

3) विशाख — कुसुमाग्रज

4) मराठी कविता जुनी आणि नवी — वा.ल. कुलकर्णी

5) प्रदक्षिणा खंड —1 — संपादक( कॉन्टिनेन्टल प्रकाशन,पुणे)

6) काव्यसंग्रह — कुसुमाग्रज( किनारा,स्वगत,जीवनलहरी,समीधा)